UGC Approved Multidiciplinary International E-research Journal

# MALE FEMALE RATIO IMBALAN[illegible] IN INDIA

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Dr. A.M. More
Dept. of Economics
Vasundhara College, Gh[illegible]
Tq. Ambajogal, Dist. [illegible]

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

53. स्त्री -भ्रूणहत्या एक समस्या 153
**डॉ. आरडले एस.डी. , सहा.प्रा. दिक्षित एस.डी.**
54. "भारतातील स्त्री-पुरूष प्रमाण असंतूलनाची कारणे " 155
**डॉ. एस.डी.भागानगरे**
55. भारतातीलस्त्री -पुरुष गुणोत्तर - एक अभ्यास 158
**डॉ.महादेवी वैजनाथ फड , कावळे एस.टी.**
56. 'भारतातील स्त्री - पुरुष प्रमाणाचे अध्ययन' 161
**डॉ. नंदकिशोर मुळे**
57. "पुरुष स्त्री प्रमाणातील बदलती प्रवृत्ती" विशेष संदर्भ मराठवाडा 162
**डॉ.डी.डी. चौधरी**
58. भारतातील स्त्री– पुरूष गुणोत्तरातील असमतोल : विशेष संदर्भ लातूर जिल्हा 165
**डॉ. एस. एस. देवनाळकर**
59. भारतातील हरवलेल्या स्त्रिया : मराठवाड्याचे व्यष्टी अध्ययन 168
**डॉ.दीपक एम.भारती**
60. भारतातीलस्त्री-पुरुष प्रमाण गुणौत्तर प्रवर्ती 173
**डॉ.गोविंद राजाराम परडे**
61. भारतातील स्त्री-पुरुष गुणोत्तरातील असमतोल सुधारण्यासाठी उपाययोजना 176
**प्रा.डॉ.हरिभाऊ कदम**
62. भारतातील स्त्री-पुरुष प्रमाण रचनेचा अभ्यास 178
**प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे**
63. भारतातील स्त्री -पुरुष प्रमाणातील असमतोलाची कारणे 182
**प्रा. डॉ. रमेश भालेराव**
64. घटते लिंग गुणोत्तर एक अभ्यास 184
**प्रा.डॉ.शिंदे डी.व्ही., प्रा.डॉ.रंदील व्ही.के.**
65. भारतीय कृषी अर्थव्यवस्था आणि विकास योजना 187
**प्रा.डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे**
66. उदगीर तालुक्याची लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्ये 189
**पाटील संतोष बालाजी, डॉ. कोरपकवाड ई. डी.**
67. घटता लिंगानूपात और समाज की मनःस्थिती 193
**प्रा. मडावी ए.डी., भालेराव सुधाकर नारायण**
68. भारताततील स्त्री–पुरुष गुणोत्तरातील समतोल सुधारण्यासाठीच्या उपाययोजना 196
**प्रा. मनीशा देशमुख, अनीरूध्द मोरे**
69. महिलांचे घटते लिंग गुणोत्तर प्रमाण: एक गंभीर समस्या 198
**डॉ.विश्वनाथ कोक्कर**
70. भारतात स्त्री-पुरुषातील असमतोलाचे प्रमाण 202
**प्रा.डॉ.राजेश्री अप्पाराव जाधव**
71. जागतिक व भारतीय लिंग–गुणोत्तर प्रवृतीच्या बदलाचा अभ्यास 204
**मारोती सदाशिव कदम, डॉ. एस.एस. पतंगे**

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 106(A) | March 2019 | UGC Approved No. 40705
Male Female Ratio Imbalance in India

# भारतातील स्त्री -पुरुष प्रमाणातील असमतोलाची कारणे

प्रा. डॉ. रमेश भालेराव
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र), शारदा महाविद्यालय, परभणी

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशाच्या उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्री व मानवी साधन सामग्रीवर अवलंबून असतो. ज्या देशाची लोकसंख्या (मानवी साधन सामग्री) दीर्घायुषी, शिक्षीत, प्रशिक्षित, अनुभवी, कार्यक्षम व कुशल असते. त्या देशाची लोकसंख्या गुणवत्ता प्रधान आहे, असे मानले जाते. कोणत्याही देशाच्या एकूण लोकसंख्येत स्त्रियांची संख्या जवळपास निम्मी असते. ज्या देशात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळतो, त्या देशात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने देशाच्या आर्थिक विकासात योगदान देत असतात. त्यामुळे तो देश आर्थिक विकासात आघाडीवर असतो. भारतात दुर्देवाने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळत नसल्याने स्त्रिया पुरुषांच्या तुलनेत शिक्षण, नौकरी यामध्ये मागे आहेत. त्यामुळे भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोल ही मोठी समस्या आहे. सन 1995 मध्ये जो जागतिक पातळीवर मानवविकास अहवाल प्रकाशित केला, तो लोकसंख्येच्या लिंगभेदासंबंधी होता. या अहवालात लिंगभेदामुळे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण, नौकरी यामध्ये संधी मिळत नाही असे नमूद केले आहे.

सध्या काही वर्षात स्त्री-पुरुष प्रमाणात जी असमानता निर्माण झाली आहे. त्यामुळे भारतीय समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, त्यामुळे भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोलची कारणे अभ्यासणे आवश्यक ठरते.

*** शोध निबंधाची उदिष्ट्ये :-**

1) भारतातील लिंग -असमानता निर्देशांक अभ्यासणे.
2) लिंगाधारित विकास निर्देशांक अभ्यासणे.
3) भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणावर दृष्टीक्षेप टाकणे.
4) स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोलची कारणमिमांसा करणे.

*** संशोधन पध्दती :-**

सदरील शोध निबंध दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, संशोधनपर लेख, वर्तमान पत्रे तसेच विविध संकेत स्थळांचा आधार घेण्यात आला आहे.

*** भारतातील लिंग असमानता निर्देशांक :- (Gender Inequality Index )**

यूएनडीपी च्या 2014 च्या अहवालात 152 देशांच्या 2013 मधील लिंग असमानता निर्देशांक देण्यात आला आहे. या अहवालानुसार भारताचा GII 0.563 आहे आणि भारताचा या यादीत 127 वा क्रमांक आहे. जो मानव विकासातील व्यावर्तन दर्शवितो.

या अहवालानुसार भारतात अजूनही माता मृत्यू दर 200, पौगंडावस्थेतील जननदर 32.8 स्त्रियांचा संसदेतील सहभाग 10.9 टक्के रोजगार क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग 28.8 टक्के आहे. इतर G20 देशांमधील लिंग समानता विचारात घेतल्यास भारतात असमानता अधिक असल्याचे चित्र असल्याचे या अहवालात दिसते.

*** लिंगआधारित विकास निर्देशांक :- (Gender Development Index)**

यूएनडीपी च्या 1995 मधील मानव विकास अहवालात सर्वप्रथम लिंग आधारित विकास निर्देशांक (GDI) ही संकल्पना मांडण्यात आली. 2014 च्या अहवालात 148 देशांचा GDI मोजला असून भारताचा GDI 0.828 आहे आणि भारताच्या यादीत 132 वा क्रमांक आहे. अहवालानुसार स्त्री -विकास निर्देशांक 0.519 तर पुरुष विकास निर्देशांक 0.627 आहे. यावरुन भारताचा GDI 8.828 येतो. भारतापेक्षा बांगला देश (0.908) आणि चीन (0.939) हे आकडे समाधानकारक आहेत.

*** भारतातील स्त्री - पुरुष प्रमाण :-**

खालील तक्त्यामध्ये 1901 ते 2011 या कालखंडातील स्त्री -पुरुष प्रमाण दर्शविले आहे.

| वर्ष | 1901 | 1911 | 1921 | 1931 | 1941 | 1951 | 1961 | 1971 | 1981 | 1991 | 2001 | 20011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दर हजारी पुरुषां मागे स्त्रियांची संख्या | 972 | 964 | 955 | 950 | 945 | 946 | 941 | 930 | 934 | 927 | 933 | 943 |

भारतातील 1901 पासून करण्यात आलेल्या जनगणनेच्या आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला असता असे निदर्शनास येते की, भारतात 1991 पासून दरहजारी पुरुषांमागे असणारी स्त्रीयांची संख्या घटत आहे. 1981 ला 1971 च्या तुलनेत अशंत: वाढ झाली, परंतू 1991 ला त्यात पुन्हा घट झाली आणि शेवटी 2011 ला ती दरहजारी पुरुषांमागे 943 इतकी झाली. जी विकसीत देशांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. म्हणून भारतातील स्त्री -पुरुष असमानतेची कारणे अभ्यासणे आवश्यक आहे. त्याचा आढावा पुढील प्रमाणे :



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 106(A) | March 2019 | UGC Approved No. 40705
Male Female Ratio Imbalance in India

*** भारतातील स्त्री - पुरुष असमानतेची कारणे :-**

प्राचीन कालखंडापासून स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. सामाजिक चळवळी आणि जनजागृतीमुळे आधुनिक काळात स्त्रियांचा दर्जा उंचावला असला तरी तो समाधानकारक पातळीपर्यंत पोहोचलेला नाही हे वास्तव आहे. आजही काही मंदिरामध्ये महिलांना प्रवेश नाही. त्यासाठी संघर्ष सुरु आहे. त्यामुळे महिलांचा समाजातील दर्जा कनिष्ठ असल्याचे दिसते. त्यातून महिलांचा जन्मच नको या प्रवृत्तीतून एकूण लोक संख्येत स्त्रियांचे प्रमाण कमी कमी होत गेले. भारतातील स्त्री- पुरुष प्रमाण असमतोलची कारणे पुढील प्रमाणे -

**1) अनिष्ठ चालिरीती :-**

पारंपारिक भारतीय समाजामध्ये अनेक सामाजिक व धार्मिक प्रथा रुढ होत्या, त्यामुळे समाजातील स्त्रियांना तुच्छतेने वागविण्याची प्रथा सुरु झाली. सतीची चाल, स्त्री-भ्रूण हत्या, बालविवाह, विधवा - विवाहास प्रतिबंध आणि बहुपत्नी यासारख्या अनिष्ठ प्रथा पाळल्यामुळे स्त्रियांच्या समाजातील दर्जा खालावत गेला. त्यामुळे मुलींना जन्म नाकारण्याची प्रवृत्ती निर्माण होत गेली आणि त्यामुळे समाजातील पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी झाली.

**2) हुंडा पध्दत व हुंडा बळी :-**

विवाहामध्ये हुंडा घेणे ही पध्दत आजही समाजामध्ये दिसून येते. मुलगी ही परक्याचे धन समजून विवाहाच्या वेळी वधुपिता कन्यादान करतो. कन्यादानाच्या वेळी वधुपिता आणखी काही वस्तू दानाच्या किंवा भेटीच्या स्वरुपात देण्याची प्रथा सुरु झाली. त्यातूनच हुंडा पध्दतीला चालना मिळाली. हुंडा देणे-घेणे प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले. हुंडा पध्दतीतूनच नववधूची मानसिक कोंडी केली जाऊ लागली. मुलींच्या वडीलांकडून आधिक पैशाची मागणी केली जाऊन नववधूंचा सासरी शारिरीक व मानसिक छळ केल्यामुळे हुंडाबळीची संख्या वाढली. यामुळे समाजातील स्त्रियांची संख्या कमी होण्यास हे कारण जबाबदार ठरते.

**3) स्त्री- भ्रूण हत्या :-**

मुलींचा समाजातील दर्जा तसेच हुंडा पध्दत, मुलगा हाच वंशाचा दिवा ही समजूत, हुंडा बळी, स्त्रियांवर होणारे बलात्कार इत्यादी कारणांमुळे मुलींचा जन्मच नको अशी मानसिकता समाजामध्ये निर्माण झाली आणि त्यातच आधुनिक तंत्र- ज्ञानाची भर पडली. नव्या तंत्राने गर्भावस्थेतच लिंगनिदान करुन मुलींचा गर्भ असेल तर भ्रण हत्या केली जाऊ लागली. याचे पर्यावसन मुलींची संख्या कमी होण्यात होऊन स्त्री - पुरुष असमतोल वाढला.

**4) शिक्षणाचा अभाव :-**

2011 च्या जनगणनेनुसार साक्षरता दर 70.04 असला तरी पुरुष साक्षरता दर 74.04 टक्के तर स्त्री साक्षरता दर केवळ 65.46 टक्के होता.
आजही भारतीय समाजामध्ये स्त्रीयांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. महिला साक्षर झाल्या तर, त्या अन्याय -अत्याचारास बळी पडणार नाहीत. परंतू असे होताना दिसत नाही. शिक्षणाचे प्रमाण जिथे जास्त असते तिथे हा समतोल कमी आहे. केरळ राज्यात साक्षरता दर उच्च असल्याने 1000 पुरुषांपागे 1084 स्त्रिया आहेत.

**5) दारिद्रय व कुपोषण :-**

भारतीय नियोजन मंडळाने 2012 ला जाहिर केलेल्या आकडेनुसार 2009-10 मध्ये 29.8 टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली जीवन जगत होती. ग्रामीण भागात ते 33.8 टक्के व शहरी भागात हे प्रमाण 20.9 टक्के हेते. दारिद्रयामुळे कुपोषणाची समस्या निर्माण होते. उपासमार, कुपोषण आणि त्यातून होणारे रोग त्यातून मृत्यूचे प्रमाण वाढते. गर्भावस्थेत मातेच्या आरोग्याची, आहाराची काळजी न घेतल्याने कमी वजनाची बालके जन्माला येतात. अशा कमी वजनाचे अभ्रक जर मुलगी असेल तर, जन्मानंतरही तिची मुलांच्या तुलनेत हेळसांड होते. त्यातूनच तिचा मृत्यू ओढावतो. परिणामी स्त्रियांची संख्या कमी होते.

**6) बाळांत मृत्यू :-**

गरोदरपणा आणि प्रसूतीच्या संबंधीत कारणामुळे भारतात दरवर्षी एका लाखाहून जास्त महिलांचा मृत्यू होतो. बाळांतपणात स्त्रियांची योग्य काळजी घेतली गेली तर, स्त्रियांचीच नव्हे तर, त्यांच्या अभ्रकाचेही प्राण वाचू शकतात. आईचे वय, बालजन्माची पूर्व तयारी, कौटूंबिक वातावरण दोन मुलांच्या जन्मामधील अंतर याचीही काळजी घेतली जात नाही. बाळंत मृत्यूचे प्रमाणामुळे देखील स्त्रियांची संख्या कमी होत आहे.

**निष्कर्ष :-**

भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोलास अनेक कारणे जबाबदार असली तरी, मुळात शिक्षणाचा अभाव हेच कारण अधिक प्रभावशाली ठरते. शिक्षणाचे प्रमाण वाढल्यास जनजागृती होऊन समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलतो. स्त्रियांना समानतेची वागणूक मिळून त्यांचा समाजातील दर्जा उंचावतो, त्यामुळे मुलींच्या जन्माचे स्वागत होऊ लागते. अनेक अभ्यासाअंती असे दिसून आले आहे की, जिथे शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. तिथे दरहजारी पुरुषांमागे स्त्रियांची संख्या अधिक असल्याचे दिसते. भारतातील केरळ हे राज्य त्याचे आदर्श उदाहरण आहे.

**संदर्भ :-**

1. Ashwini Mahajan & Gaurav Datt (2012)
2. Mishra and Puri (2012) Indian Economy
3. UNDP (2007) Human development Report.
4. Muzumadar, Indrani and Neeta N. (2011).
Gender dimensions, Employment trends in India.
5. Goel M.M. Demographic Dividend in India (Dec. 2012)
The Indian Economic Journal
6. https://hi.m.wickipidia.org. wiki.
7. https://mr.m.wikipidia.org.wiki.